# हिंदूराष्ट्राची संकल्पना

**डॉ.नी.र.वऱ्हाडपांडे**

महाराष्ट्रात हिंदुत्ववादी पक्षाचे सरकार स्थापित झाले. त्यानंतर एका आठवड्यासाठी का होईना पण केंद्रात देखील हिंदुत्ववादी सरकार स्थापित झाले व त्याला पाडण्यासाठी बाकी सारे पक्ष एकत्रित झाले. पुढच्या निवडणुकीत देखील हिंदुत्ववाद विरुद्ध इतर असे ध्रुवीकरण होण्याचा संभव आहे. हिंदुत्ववाद हा पुढील राजकारणाचा याप्रमाणे तुलाबिंदु म्हणजे फल्क्रम होणार असल्यामुळे हिंदुराष्ट्राच्या संकल्पनेचा सम्यक् विचार होणे आवश्यक आहे.

वस्तुत: पाकिस्ताननिर्मिति झाली त्यावेळीच मुस्लिमबहुल सलग प्रदेश भारतातून बाहेर काढून त्यांचे वेगळे राष्ट्र करण्याच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आली. काँग्रेसने 'आम्ही द्विराष्ट्रवाद मान्य केला नाही' असे कितीही म्हटले तरी ते म्हातारीने कोंबडा झाकून सूर्योदय झाला नाही असा आव आणण्यासारखे आहे.

इंग्रजांनी दिलेला निवाडा मानण्याशिवाय काँग्रेसला गत्यंतर नव्हते म्हणून पाकिस्तानला मान्यता द्यावी लागली याचा अर्थ काँग्रेसला द्विराष्ट्रवाद मान्य आहे असा होत नाही असे म्हणण्याची सोय नाही. कारण पाकिस्तान सोडून उरलेला भारत हे एक राष्ट्र आहे असे गृहीत धरुन काँग्रेसने राज्य केले नाही. काश्मीर मुस्लिमबहुल म्हणून त्याला वेगळा न्याय लागू करुन ३७० कलम जारी करणे, मुसलमानांसाठी वेगळ्या नागरी संहितेची तरतूद करणे, मुसलमानांना धर्माच्या आधारावर अल्पसंख्य घोषित करुन विशेष अधिकार देणे ही कृत्ये काँग्रेसला द्विराष्ट्रवाद मान्य असल्याची प्रमाणे आहेत. पाकिस्तान मान्य करण्यात अगतिकता होती, पण वरील धोरणे आखण्यात काँग्रेसला कोणत्याच अगतिकतेने घेरले नव्हते. द्विराष्ट्रवादाचा क्रियाशील पुरस्कार हेच या धोरणांचे स्वरुप आहे.

भारतात हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत असे मानल्याने देखील हिंदू राष्ट्र मानल्यासारखे होते, आजकालचे बहुतेक काँग्रेस नेते हे तत्त्व मानून आपली धोरणे आखतात. पण त्यांच्या धोरणावर ज्या नेहरुवादाचा पगडा आहे तो भारतात दोन राष्ट्रे आहेत या अर्थी देखील हिंदू राष्ट्र मानीत नाही, नेहरुवादाच्या मते 'भारत हे राष्ट्रच नाही, ते निरनिराळ्या वेळी आलेल्या आक्रमकांचे एक कडबोळे आहे. भारतात आज असलेल्या जनसमूहापैकी काँग्रेसने मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली ज्यांना आदिवासी म्हणून संबोधले त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही भारताचे मूलनिवासी नाहीत. बाकी सर्व परकीय आहेत. आर्य, द्रविड, शक, हूण, ग्रीक, तुर्क, अफगाण, मुघल वगैरे अनेक जनसमूह बाहेरुन आक्रमक म्हणून आले व येथे स्थायिक झाले. या सर्व वगवेगळ्या जमाती आहेत. औरंगजेबाचे पूर्वज जसे परकीय आक्रमक तसेच शिवाजीचे देखील. शिवाजीचे पूर्वज औरंगजेबाच्या पूर्वजाच्या आधी आले एवढाच त्यांच्यात फरक. पण एवढ्यावरुन शिवाजी भारतीय व औरंगजेब परकीय ठरत नाही.'

## मग इंग्रजांचे काय ?

'इंग्रज भारतात स्थायिक झाले नाहीत, त्यांनी भारताच्या बाहेरुन भारतावर राज्य केले म्हणून त्यांच्या अमलाला परकीय अंमल म्हणता येते. पण असे असले तरी इंग्रजी भाषा व संस्कृति हा या देशाचा अविभाज्य

**हिंदू राष्ट्राची स्थापना होऊन हे राष्ट्र जगात अग्रेसर व्हायचे असेल तर शिक्षणाची आमूलाग्र पुनर्घटना करावी लागेल. नेहरुंनी या देशावर आणलेल्या अनेकविध आपत्तींपैकी सगळ्यात मोठी आपत्ति शिक्षणाचे विकृतीकरण ही आहे. पाळण्यापासून इंग्रजीचे बंड व आपण भारतीय आहोत, विशेषत: हिंदू आहोत याची लाज वाटेल असे संस्कार लहानपणापासून मनावर करणारे देशद्रोहाचे कारखाने देशात सुरु आहेत. तसेच धार्मिक अल्पसंख्यांकांना आपल्या आपल्या धर्माचे शिक्षण देण्यासाठी स्वायत्त संस्था चालविण्याचा मुलभूत अधिकार संविधानाने बहाल केलेला आहे.**

भाग आहे, आमच्या संस्कृतीचा तो 'चवथा अध्याय' आहे. हिंदु संस्कृति हा चार अध्यायापैकी फक्त एक अध्याय आहे, म्हणून भारताला हिंदु राष्ट्र म्हणणे हा चतुर्थांश मालमत्तेच्या अधिकाऱ्याने सारी मालमत्ता लुबाडण्याचा प्रयत्न आहे.''

भारत सरकारवर संस्कृत शिकविण्याची खास जबाबदारी आहे अशी सर्वोच्च न्यायालयात फिर्याद करण्यात आली तेव्हा भारत सरकारतर्फे जे उत्तर देण्यात आले त्यावरुन नेहरुवादाची वरील 'राष्ट्रकल्पना' स्पष्ट होते.

**नेहरुवाद = मिशनरी अधिक कम्युनिस्ट विचार**

सरकारी वकील म्हणाला. 'संस्कृत शिकविण्याची भारत सरकारवर जबाबदारी आहे असे मानले तर फारसी/अरबी शिकविण्याची वा झुलूंची भाषा शिकविण्याची देखील जबाबदारी आहे असे का मानू नये ?'

'फारसी व अरबी या भारतावर स्वारी करणाऱ्या अरब, तुर्क, अफगाण व मुघल यांच्या वा त्यांनी आपल्या मानलेल्या भाषा होत्या. या आक्रमकाप्रमाणेच आर्य देखील आक्रमक होते व त्यांची भाषा संस्कृत होती. तेव्हा संस्कृत व अरबी/फारसी यांच्यात भारत सरकारच्या दृष्टीने फरक करण्याचे काय कारण ?' असा हा सरकारी प्रश्न आहे.

संस्कृत, अरबी/फारसीप्रमाणेच परकीय आहे एवढे म्हणूनच सरकारी वकीलाचे समाधान झाले नाही. अरबी/ फारसी परकीय असल्या तरी शिकण्याजोग्य भाषा आहेत, पण संस्कृत ही झुलू भाषेसारखीच एक रानटी लोकांची मूल्यहीन भाषा आहे असे सरकारी मत देखील त्यांने देशातील सर्वोच्च न्यायसंस्थेसमोर मांडले.

भारत हे राष्ट्रच नाही या वरील नेहरुसिद्धांतावर असा प्रश्न उपस्थित होतो की भारत हा अनेक राष्ट्रीय समूहांचा देश असेल तर साऱ्या भारताचे एक राज्य असले पाहिजे असा आग्रह तरी कशाला ? हा प्रश्न नेहरुवादाची भलावणी करणाऱ्या कोणत्याही 'विचारवंताने' विचारला नाही, पण तो सक्रियरीतीने भारतीय मुसलमानांनी व नागा बण्डखोरांनी विचारला. नागांना राजकीय स्वायत्तता देऊन नेहरुंनी याचे उत्तर दिले. पण याने त्यांचे समाधान झालेले नाही व नेहरुवाद खरा मानला तर देशाची आणखी दोनच नव्हे तर शंभर शकले केल्याशिवाय सुसंगती साधणार नाही.

नेहरुंचे वरील विचार हे मिशनरी व कम्युनिस्ट यांनी प्रसृत केलेले विचार आहेत. कम्युनिस्ट व मिशनरी ज्या देशात असतात तेथे ते असेच विचार प्रसारित करीत असतात. कम्युनिस्ट राष्ट्रकल्पनाच मानीत नाहीत, कम्युनिस्ट देशाने बिगर कम्युनिस्ट देशावर केलेले आक्रमण हे आक्रमण नसून विमोचन असते व तसेच समजून बिगर कम्युनिस्ट देशांनी त्याचे स्वागत केले पाहिजे अशी त्यांची शिकवणूक आहे. नेहरु व कम्युनिस्ट यांच्यात फक्त कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य असण्या/ नसण्याच्या बाबतीच फरक हाता. बाकी सर्व बाबतीत नेहरुंचे विचार ही कम्युनिस्ट विचारांची कर्बप्रत होती. चीनसारख्या कम्युनिस्ट देशाने केलेल्या आक्रमणाचे कम्युनिष्टांनी स्वागत केले तसे नेहरुंना करणे शक्य

नव्हते. कारण ते स्वतःच भारताचे पंतप्रधान होते. त्यामुळे कम्युनिस्ट आक्रमण हे माझ्यावरील आक्रमण नाही अशी बतावणी करणे त्यांना शक्य नव्हते.

सारे देश कम्युनिस्ट आक्रमणाला बळी पडण्याइतके दुबळे असावे हे कम्युनिस्टांचे उद्दिष्ट असल्यामुळे त्यांचा राष्ट्रवादाला प्रखर विरोध असतो तसाच तो भारतीय राष्ट्रवादालाही आहे व 'भारत हे राष्ट्र नसून बहुराष्ट्रीय राज्य आहे' असा त्यांचा प्रचार सुरु आहे. मिशनऱ्यांच्या कारवायांना देखील राष्ट्रवादाने पायबंद बसतो म्हणून त्यांचा राष्ट्रवादाला नेहमी विरोध असतो. जपानचे राष्ट्रीय उत्थान झाले तेव्हा त्याने मिशनऱ्यांना हाकलून दिले. चीननेही तसेच केले. भारतातही स्वातंत्र्यानंतर मिशनऱ्यांच्या कारवायांना पायबंद घालण्याची मागणी सतत केली जात आहे. नेहरुवादामुळे त्या मागण्यांची पूर्ती होऊ शकत नाही.

**सुशिक्षितात संस्कृत विद्येबद्दल आदर होता, बोलताना संस्कृत सुभाषितांचा प्रयोग करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जात होते.**

**नेहरुयुगात ही स्थिती पार पालटली. संस्कृत हा हेटाळणीचा विषय झाला. विज्ञानाच्या विद्यार्थ्याला संस्कृत घेताच येणार नाही या प्रकारे अभ्यासक्रमांची आखणी झाली. संस्कृतचे अंक गुणानुक्रम ठरविताना विचारात घेण्यात येऊ नयेत असा नियम करण्यात आला. पुष्कळशा शाळातून संस्कृत अजिबात काढूनच टाकण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात सरकारी वकिलाने पक्ष नेहरुवादाचीच परिणती आहे.**

## ऐक्याची स्मृती हेच राष्ट्रीयत्व

तात्पर्य आज भारतात जो हिंदुराष्ट्रविरोधी विचार प्रचलित आहे तो केवळ हिंदू राष्ट्रच नव्हेइ तर भारताचे कोणत्याही स्वरुपाचे राष्ट्रीयत्व नाकारणारा आहे. भारत हे आज राष्ट्र नाही व पूर्वी कधीही राष्ट्र नव्हते, पण आम्ही आजपर्यंत जन्मलेल्या भारतीयांपेक्षा इंग्रजी शिक्षणाने अधिक श्रेष्ठ झालेले भारतीय त्याला राष्ट्र बनविणार आहोत असा या स्वयंमन्य श्रेष्ठांचा दावा आहे.

पण भारतात पूर्वापत्तर चालत आलेले कोणतेच एकत्व नाही, इंग्रजांनी आम्हाला जिंकून येथे पूर्वी कधी नसलेले एक राज्य निर्माण केले हाच आमच्या एकत्वाचा व राष्ट्रीयत्वाचा पाया आहे.' असा प्रचार करुन देशात एकत्वाची भावना निर्माण होईल की देशाची शकले पडतील याचा हे 'सेक्युलॅरिस्ट विचार करीत नाहीत. शिवाय एकत्व जर नाहीच तर ते बळेच निर्माण करायचेच कशाला ? भारतात जेवढे राष्ट्रीय समूह असतील त्यांच्यात भारताची भूमि वाटून द्यायला काय हरकत आहे ? वेगळे राष्ट्रीय समूह सलग प्रदेशात आज राहत नसले तरी लोकसंख्येची पुनरर्रचना करुन त्यांना सलग प्रदेशात वस्ती करायला लावता येईल.

हिंदू राष्ट्रवाद हा भारताचे राष्ट्रीयत्वच मुळात नाकबूल करणाऱ्या नेहरुवादाला समुळ छेद देणारा विचार आहे. या राष्ट्रात हजारो वर्षापासून एकत्व नांदत आले आहे व ते हिंदुत्व या शब्दाने व्यक्त होते, दुसऱ्या कोणत्याही शब्दाने व्यक्त होत नाही असे हिंदू राष्ट्र वादाचे म्हणणे आहे.' हिंदू= जर भारतीय तर या देशातील कोट्यवधी लोकांचा समावेश न करणारा हिंदू हा शब्द वापरण्यावर तुमचा कटाक्ष का?' असे नरसिंहरावांनी विचारले. याचे उत्तर असे की, भारतीय हा शब्द फक्त प्रदेशवाचक आहे, भौगोलिक आहे, त्याने राष्ट्रीयत्वाचा बोध होत नाही. केवळ प्रदेशाचा निर्देश केल्याने त्या प्रदेशात राहणारे सर्व एका राष्ट्राचे घटक आहेत असे ठरत असेल तर सारी उत्तर अमेरिका हे एक राष्ट्र. सारी दक्षिण अमेरिका हे दुसरे राष्ट्र, युरोप हे तिसरे राष्ट्र असे मानता येईल. पण राष्ट्र ही संकल्पना भावनिक आहे, भौगोलिक नाही. ज्या जनसमूहामध्ये एकत्वाची भावना असते त्याला राष्ट्र म्हणतात. या एकत्वाच्या भावनेत समान इतिहास, समना शत्रुत्व व मित्रत्व यांचा समावेश होतो. तसेच राष्ट्र म्हणविणाऱ्या जनसमूहात प्रेमाचे समान विषय असतात.

हे एकत्व निर्माण करण्यासाठी समान भाषा, समान राज्य, समान वसतिप्रदेश यांची मदत होते. कोशामध्ये समान भाषा, समान प्रदेश, समान राज्य वगैरे राष्ट्रीयत्वाची अंगे सांगितली आहेत. पण ही अंगे

एकत्वाची भावना उत्पन्न होण्यास सहायभूत आहेत म्हणून ती राष्ट्रीयत्वाची अंगे मानली गेली, त्यांनी एकत्वाची भावना निर्माण करण्यास मदत केली नसेल तर ती राष्ट्रीयत्वाची अंगे होऊ शकत नाहीत.

धर्म हेही असे एक अंग आहे. धर्मामुळे एकत्वाची भावना निर्माण होऊ शकते. तेव्हा धर्माचा व राष्ट्रीयत्वाचा संबध नाही हे म्हणणे दाम्भिकपणाचे आहे.

वरील ऐक्यपोषक गोष्टीपैकी आज बहुतेक नामशेष झाल्या असतील तरी त्यांची स्मृती आजच्या घटकेला ऐक्यपोषक ठरत असेल तर हे समान घटक राष्ट्रीयत्वाचे घटक आहेत असे म्हणता येते. ज्यू लोकांचे उदाहरण या संदर्भात उद्बोधक आहे. ज्यू लोकांना त्यांच्या निवासस्थानातून २००० वर्षांपूर्वी हाकलून देण्यात आले. ते आपली मुळ भाषा हीब्रू पुर्णपणे विसरले. त्यांचा धर्म मात्र कायम राहिला. धर्माबरोबरच ज्यू लोकांचा वंश समान आहे हा त्यांच्या एकत्वाचा महत्वाचा घटक आहे असे सांगण्यात येते..

## संस्कृतविरुद्ध जिहाद

जगभरात विखुरलेले ज्यू निदान पाहून तरी ते एकाच वंशाचे असतील असे ओळखता येत नाही. भारतात स्थायिक झालेले ज्यू तेली हिंदू म्हणून ओळखले जात. त्यांचा वंश वेगळा आहे हे त्यांच्याकडे पाहून कोणालाच कळले नव्हते. तेव्हा वशैक्य हा ज्यूंच्या एकत्वभावनेचा आधार नसून 'आपला वंश एक आहे' ही भावना हा आधार आहे. मग ती भावना वस्तुस्थितीवर आधारली असो वा नसो.

वंशाप्रमाणे भाषेची स्थिती आहे. जगभर विखुरलेल्या ज्यूंना कोणतीही एक भाषा येत नव्हती, ते आपल्या निवासाच्या देशाची भाषा बोलत होते. 'पण आपल्याला आपल्या मूळ देशातून हाकून देण्यात आले आहे, आपण आपल्या मूळ देशात होतो तेव्हा हीब्रू बोलत होतो व या हीब्रू भाषेतच जगभर पूज्य मानला गेलेला बायबल हा ग्रंथ रचलेला आहे' ही जगभरातील ज्यूंची स्मृती कायम होती. त्या स्मृतीच्या आधारेच त्यांनी इस्राएलचा स्थापनेबरोबरच केव्हाच मृत झालेल्या आपल्या आपल्या पुरातन हिब्रु भाषेचे पुनरुज्जीवन केले व आज इस्त्राएलच्या सारा कारभार हीब्रू भाषेत चालतो. तारांश प्राचीन काळच्या एकत्वाच्या स्मृतीवर इस्राएल हे राष्ट्र उभारले गेले आहे, ते आजच्या ठिकाणी स्थापन होण्याच्या आधी राष्ट्रीयत्वाला आधारभूत असलेले भाषा, वंश, व प्रदेश यापैकी काहीच अस्तित्त्वात नव्हते.

संस्कृत भाषेची स्थिति हीब्रु भाषेपेक्षा पुष्कळच चांगली आहे. इस्लामी आक्रमणाच्या काळात तिची सरकारमान्यता नाहीशी झाली तरी विद्वानांची समान भाषा म्हणून तिचा १८ व्या शतकापर्यंत आसेतुहिमाचल वापर होत होता व तिच्यात नवसाहित्याची निर्मिती होत होती. ब्रिटिश काळात ती विद्वानांची भाषा देखील राहिली नाही तरी मॅट्रिकपर्यंत ती जवळजवळ आवश्यकच होती, तिला पर्याय ड्रॉइंग हा होता व ड्रॉइंग हा अत्यंत विशेष प्रज्ञेच्या विद्यार्थ्यांनाच जमू शकणारा विषय असल्यामुळे मॅट्रीक झालेला विद्यार्थी संस्कृत शिकला नाही असे क्वचित्‌च आढळत असे. मॅट्रिकच्या अभ्यासक्रमातले संस्कृत विद्येबद्दल आदर होता, बोलताना संस्कृत सुभाषितांचा प्रयोग करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण समजले जात होते.

नेहरुयुगात ही स्थिती पार पालटली. संस्कृत हा हेटाळणीचा विषय झाला. विज्ञानाच्या विद्यार्थ्यांना संस्कृत घेताच येणार नाही या प्रकारे अभ्यासक्रमांची आखणी झाली. संस्कृतचे अंक गुणानुक्रम ठरविताना विचारात घेण्यात येऊ नयेत असा नियम करण्यात आला. पुष्कळशा शाळातून संस्कृत अजीबात काढूनच टाकण्यात आले. सर्वोच्च न्यायालयात सरकारी वकीलाने मांडलेला पक्ष नेहरुवादाचीच परिणति आहे.

संस्कृतच्या विरुद्ध असा युक्तिवाद करण्यात येतो की इंग्रज जशी परकीय इंग्रजांनी भारतात आणली तशीच संस्कृत भाषा परकीय 'आर्यांनी आणली, तेव्हा संस्कृत ही आमच्या राष्ट्रीयत्वाशी संबद्ध व इंग्रजी मात्र परकीय हा पक्षपात बरोबर नाही.

**सारे देश कम्युनिस्ट आक्रमणाला बळी पडण्याइतके दुबळे असावे हे कम्युनिस्टांचे उद्दिष्ट असल्यामुळे त्यांचा राष्ट्रवादाला प्रखर विरोध असतो तसाच तो भारतीय राष्ट्रवादालाही आहे व 'भारत हे राष्ट्र नसून बहुराष्ट्रीय राज्य आहे' असा त्यांचा प्रचार सुरु आहे. मिशनऱ्यांच्या कारवायांना देखील राष्ट्रवादाने पायबंद बसतो म्हणून त्यांचा राष्ट्र वादाला नेहमी विरोध असतो. जपानचे राष्ट्रीय उत्थान झाले तेव्हा त्याने मिशनऱ्यांना हाकलून दिले. चीननेही तसेच केले. भारतातही स्वातंत्र्यानंतर मिशनऱ्यांच्या कारवायांना पायबंद घालण्याची मागणी सतत केली जात आहे. नेहरुवादामुळे त्या मागण्यांची पूर्ती होऊ शकत नाही.**

आर्याक्रमण मिशनऱ्यांच्या डोक्यात झाले, इतिहासात नाही हा मुद्दा बाजूला ठेवला तरी पाश्चात्यांनी मांडलेल्या सिद्धांतानुसार संस्कृत ही भारताबाहेरुन आलेली नाही. मॅक्सम्यूलर इत्यादि संशोधकांच्या मते बाहेरुन स्वारी करुन आलेले आर्य 'इण्डोयुरोपीय' नावाची भाषा बोलत होते, संस्कृत नव्हे, भारतातच त्यांच्या इण्डोयुरोपीय भाषेतून पुढे संस्कृत उद्भवली. संस्कृतचे भारताबाहेर कुठेही अस्तित्व असल्याचा पुरावा नाही; व तिचे असे अस्तित्व कोणताही भाषाविद् मानीत नाही.

भारताच्या राष्ट्रीयत्वाचा समूळ नाश करु इच्छिणारा नेहरुवाद निपटून काढणे हे हिंदू राष्ट्रवादाचे प्रमुख लक्ष्य आहे. पण हे नकारात्मक लक्ष्य झाले.

### धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर

सकारात्मक लक्ष्य कोणते हे यावरुनच स्पष्ट होते. भारत हे परकीय आक्रमकांचे कडबोळे आहे या मिथ्याप्रचारातून उद्भवणाऱ्या सर्व धोरणांचा कसून विरोध करणे व भारत हे निदान ६००० वर्षांपासून एक राष्ट्र आहे, त्यावर इस्लामी आक्रमणापूर्वी जी आक्रमणे झाली ती त्याने यशस्वीरीतीने मोडून काढली व आक्रमकांना बेमालूमरीतीने आत्मसात् केलं. इस्लामी आक्रमण व नंतरचे ब्रिटिश आक्रमण यांचा बीमोड हे राष्ट्र या तऱ्हेने बेमालूमपणे करु शकले नाही, इस्लामी आक्रमणाचा मराठ्यांनी निर्णायक सैनिक पराभव केला, पण त्या आक्रमणाचे अपत्य जो मुस्लिम समाज त्याला परत आपल्यात सामावून घेणे त्यांना जमले नाही, ब्रिटिश आक्रमणाचा तर कोणत्याच अर्थी बीमोड होऊ शकला नाही, त्याचा प्रभाव अजून कायम आहे, भारतात जे परकीय समाज म्हणून सांगण्यात येतात ते वस्तुः परकीय नसून आक्रमकांनी तोडलेले आमच्या समाजाचे लचके आहेत, मुस्लिम व ख्रिस्ती समाज हे असेच लचके आहेत, ते मूळ शरीरापासून पूर्णपणे विभक्त झाले नाहीत, त्यांना दूर करणारी जखम हिंदू समाजाने भरुन काढून त्यांना परत आत्मसात केले पाहिजे, आर्याक्रमण ही मिशनरी डोक्यातून निघालेली एक थाप आहे, या निर्विवाद ऐतिहासिक सत्यावर आधारलेल्या राष्ट्रीयत्वाची जोपासना करणे.

असे करण्यासाठी आजच्या दोषपूर्ण संविधानात पुष्कळच बदल करावे लागतील. 'सेक्युलर' हा अर्थशून्य शब्द त्यातून काढून 'हे हिंदू राष्ट्र आहे' असे संविधानाने निःसन्दिग्धरीतीने जाहीर केले पाहिजे.

हिंदू राष्ट्र म्हटल्याबरोबर पाकिस्तान ज्याप्रमाणे मुस्लिम राष्ट्र आहे त्याप्रमाणे धर्म ग्रंथाना प्रमाण मानून चालणारे राष्ट्र असा अर्थ पुष्कळ लोकांच्या मनात येतो. म्हणून हिंदू राष्ट्र या शब्दप्रयोगाची व्याख्या केली पाहिजे. हिंदू राष्ट्र म्हणजे श्रुतिस्मृतिपुराणांना प्रमाण

मानून चालणारे राष्ट्र नव्हे. श्रुतिस्मुतिपुराणेच काय, जगातला कोणताही ग्रंथ ईश्वरप्रणीत नाही व तो प्रमाण मानून हे राष्ट्र व त्याचे सरकार चालणार नाही. या देशाची संसद ही या देशात सार्वभौम राहिल. तिच्यावर कोणत्याही तथाकथित ईश्वरप्रणीत ग्रंथाचा अधिकार चालणार नाही.

धर्मस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार मानणारे कलम रद्द करुन त्याऐवजी उपासना स्वातंत्र्य हा शब्द घालण्यात यावा; कारण धर्म व रिलिजन हा देखील फार व्यापक शब्द आहे. धर्म जीवनाच्या सर्व अंगांचे नियमन करतो त्याचप्रमाणे रिलिजन देखील फक्त उपासनेपुरता मर्यादित नाही. इस्लाम व खिस्ती धर्म स्वीकारला की फक्त मंदिराऐवजी मशिदीत वा चर्चमध्ये जाण्याइतक फरक पडत नाही. इस्लामची शरियत त्याचप्रमाणे बायबल व चर्चच्या आज्ञा यावर आधारलेला खिस्ती कायदा हा जीवनाच्या सर्वच अंगांना स्पर्श करतो. त्यामुळे भारतातल्या एखाद्या समुहाला धर्मपालनाचा मूलभूत अधिकार देणे म्हणजे भारतीय संसदेने. 'आपली सत्ता त्या समूहावर नाही, तो स्वायत्त समुह आहे. त्या समूहाचे नियमन फक्त त्यांच्या धर्माचे कायदे करतील, या धर्मिक कायद्यांचा अर्थ करण्याचा अधिकार देखील सरकारला नाही, तो अधिकार मुल्लामौलवींचा वा पाद्र्यांचा आहे' असे कबूल करणे होय. तेव्हा धर्मस्वातंत्र्य देणारे कलम ताबडतोब रद्द केले पाहिजे.

हे कलम रद्द केले म्हणजे अर्थात् मुसलमान व खिस्ती यांच्याप्रमाणेच हिंदूना देखील मूलभूत अधिकार नाही हे मानल्यासारखे होईल. 'मग हे हिंदू राष्ट्र कसले ? असे विचारण्यात येईल. त्यावर उत्तर हेच की हिंदू राष्ट्र हे हिंदूधर्माचे राष्ट्र नाही. हिंदू धर्माचा जो राष्ट्रीयतापोषक, ऐक्यपोषक व प्रगतिकारक भाग आहे तोच फक्त हिंदु राष्ट्रात मान्य केला जाईल व ऐक्यपोषक राष्ट्रपोषक काय आहे व काय नाही याचा निर्णय संसद् करील, धर्मग्रंथ नाही. सती, अस्पृशता वगैरे गोष्टी हिंदू धर्मात असल्या तरी हिंदू राष्ट्र त्यांना गुन्हेच मानील कारण या गोष्टी ऐक्यपोषक व प्रगतिकारक नाहीत.

### हिंदूंच्या धर्मांतराला बंदी

धर्माच्या ऐवजी उपासनेचे स्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार मान्य केला तरी ता मान्य करणाऱ्या कलमातच असे उपासनास्वातंत्र्य देशाच्या दंडसंहितेच्या आड येणारे नसले पाहिजे अशी अट घातली पाहिजे, नाही तर उपासनास्वातंत्र्यांच्या नावाखाली नरबलीच्या प्रथेचे देखील समर्थन करण्यात येऊ शकते.

सेक्युलर या शब्दाचा इंग्रजी अर्थ परलोक न मानणारा इहवादी म्हणजे नास्तिक असा आहे. पण भारतातील जवळ जवळ साऱ्याच पक्षांना नास्तिक या शब्दाची भीती वाटते, म्हणून सेक्युलर या शब्दाचा, 'सर्वधर्मसमत्व असा कोणत्याच इंग्रजी कोशात न आढळणारा अर्थ करण्यात येतो. हिंदी भाषांतरात तर 'पन्थनिरपेक्ष' असा त्याहीपेक्षा विचित्र अर्थ करण्यात आला आहे. असा अर्थ करणाऱ्यांच्या मते हिंदूधर्म, इस्लाम, व खिस्ती धर्म हे पंथ आहेत. नास्तिक शब्दाची भीती वाटल्यामुळे केवळ 'सेक्युलर' या शब्दाचाच नव्हे तर पंथ या शब्दाचाही खून करण्यात आला.

'आमचे सरकार कोणताच ग्रंथ ईश्वरप्रणीत मानत नाही या अर्थी ते नास्तिक आहे, मानवी जीवन नियमित करण्याचा धर्माचा अधिकार ते अमान्य करते, असे नियमन करताना कोणत्याही पारलौकिक तत्त्वाचा आश्रय घेणे सरकारला मान्य नाही' असे नि:सन्दिग्धपणे जाहीर करणे आवश्यक आहे.

### मग धर्माचे स्थान काय?

धर्म हा वैयक्तिक श्रद्धेचा व उपासनेचा भाग म्हणून

सरकार त्याला परवानगी देईल. अशा वैयक्तिक श्रद्धांची सामूहिक अभिव्यक्ति करण्यासाठी सार्वजनिक उपासनास्थळे, यात्रा इत्यादी प्रकारांनाही परवानगी राहील मग त्या कोणत्याही धर्माच्या असोत. पण मूलभूत अधिकार म्हणून यापैकी कोणत्याही कृतीला मान्यता देण्यात येणार नाही. भारत हे हिंदू राष्ट्र असल्यामुळे हिंदूच्या धर्मांतरावर या देशात बंदी राहील, कारण धर्मांतराने राष्ट्रांतर होते असा भारताचा अनुभव आहे. पाकिस्तानची निर्मिती हे याचे ताजे उदाहरण आहे. हिंदूंच्या धर्मांतरावरील बंदीप्रमाणेच परधर्मांत गेलेल्या भारतीयांना परत स्वधर्मात आणण्याच्या साऱ्या प्रयत्नांना सरकारचा आशीर्वाद राहिल.

वरील सूचना पुष्कळ वाचकांना शहारे आणणाऱ्या वाटतील. पण सध्याचे संविधान तयार करताना या सूचना करण्यात आल्या होत्या. प्रसिद्ध तत्त्वज्ञ डॉ.राधाकृष्णन् हे या सूचनांच्या पक्षाचे होते असे त्यांनी मला एका मुलाखतीत सांगितले होते. चीनने क्रांति झाल्याबरोबर मिशनऱ्यांवर बंदी घातली. जपानने देखील तसेच केले. ब्रिटनमध्ये देखील खिस्ती लोकांचे धर्मांतर घडवून आणणे हा राजद्रोह आहे कारण ब्रिटनची राणी ही खिस्तीधर्मरक्षक-'डिफेंडर ऑफ द फेथ' आहे. पाकिस्तान व बंगला देश यात तर मुसलमानाला आपल्या धर्माचा त्याग करण्यास उद्युक्त करणे हा देहांतशासनयोग्य गुन्हा आहे. मुसलमानाचे धर्मांतर घडवून आणण्यास पैगंबरावरील त्याची श्रद्धा नाहीशी करणे आवश्यक असते व पैगम्बराचा अपमान इस्लामी देशात देहांतयोग्य मानला जातो.

**नेहरुवादाच्या मते 'भारत हे राष्ट्रच नाही, ते निरनिराळ्या वेळी आलेल्या आक्रमकांचे एक कडबोळे आहे. भारतात आज असलेल्या जनसमूहापैकी काँग्रेसने मिशनऱ्यांच्या प्रभावाखाली ज्यांना आदिवासी म्हणून संबोधले त्यांच्या व्यतिरिक्त कोणीही भारताचे मूलनिवासी नाहीत. बाकी सर्व परकीय आहेत. आर्य, द्रविड, शक, हूण, ग्रीक, तुर्क, अफगाण, मुघल वगैरे अनेक जनसमूह बाहेरुन आक्रमक म्हणून आले व येथे स्थायिक झाले. या सर्व वगवेगळ्या जमाती आहेत. औरंगजेबाचे पूर्वज जसे परकीय आक्रमक तसेच शिवाजीचे देखील. शिवाजीचे पूर्वज औरंगजेबाच्या पूर्वजाच्या आधी आले एवढाच त्यांच्यात फरक. पण एवढ्यावरुन शिवाजी भारतीय व औरंगजेब परकीय ठरत नाही.'**

हिंदूंच्या धर्मांतरावर बंदी याचा अर्थ भारतीयांना विश्वासस्वातंत्र्य नाही असा नाही. एखाद्या हिंदूला एखाद्या मौलवीचे प्रवचन ऐकून पैगंबरावर श्रद्धा बसली तर त्याने मूर्तिपूजा सोडून मशिदीत जाऊन नमाज पढण्यास हरकत नाही. पण जनगणनेमध्ये त्याची गणना हिंदू म्हणूनच होईल, त्याला 'माझा धर्म इस्लाम आहे, असे सरकारदरबारी म्हणता येणार नाही व विधिपूर्वक इस्लामची दीक्षा घेता येणार नाही. तसेच स्वत:ची श्रद्धा बदलली म्हणून आपल्या बायकामुलांनाही समाजाने मुसलमान समजावे अशी अपेक्षा त्याला बाळगता येणार नाही.

## देशद्रोहाचे कारखाने

हिंदू राष्ट्राची स्थापना होऊन हे राष्ट्र जगात अग्रेसर व्हायचे असेल तर शिक्षणाची आमूलाग्र पुनर्घटना करावी लागेल. नेहरुंनी या देशावर आणलेल्या अनेकविध आपत्तीपैकी सगळ्यात मोठी आपत्ती शिक्षणाचे विकृतीकरण ही आहे. पाळण्यापसून इंग्रजीचे बंड, व आपण भारतीय आहोत, विशेषत: हिंदू आहोत, याची लाज वाटेल असे संस्कार लहानपणापासून मनावर करणारे देशद्रोहाचे कारखाने देशात सुरु आहेत. तसेच धर्मिक अल्पसंख्यांना आपल्या धर्माचे शिक्षण देण्यासाठी स्वायत्त संस्था चालविण्याचा मूलभूत अधिकार संविधानाने बहाल केलेला आहे. हे धार्मिक शिक्षण कोणते याचा मागोवा घेतला तर असे आढळून येईल की 'जो पैगंबराला मानीत नाही तो नरकात जातो, त्याची कत्तल करणे हा धर्म आहे, जगाची विभागणी 'दारुल इस्लाम' व 'दरुल हरम' या दोन भागात होते; जेथे इस्लामी राज्य नाही तो मुसलमानांसाठी शत्रुप्रदेश होय, पैगंबराला न मानणाऱ्याचे धन वा स्त्रिया लुटणे हे धार्मिक कर्तव्य आहे' अशी शिकवणूक सरकारी अनुदानातून चालणाऱ्या या संस्थातून दिली जाते. याबद्दल ज्याला शंका असेल त्याने कलकत्ता उच्च न्यायालयात यासंबंधी जी तक्रार

करण्यात आली होती ती वाचून पहावी. या तक्रारीचा निकाल लावताना न्यायमूर्तींनी म्हटले की या तक्रारीची दखल घ्यायची तर न्यायालयांना धर्मात हस्तक्षेप करावा लागेल व तसे करण्याचा न्यायालयांना अधिकार नाही.

मिशनरी संस्थांचाही तोच प्रकार आहे. 'जो येशूला मानीत नाही तो नरकात जातो, मग तो कितीही सदाचारी असो, जो येशूला मानीत नाही त्याला सद्गति मिळो अशी प्रार्थना करण्याची खिस्तीधर्मीयांना मनाई आहे.' अशी शिकवणूक देणारे मिशनरी केवळ खिस्त्यांनाच असे शिकवितात असे नाही तर हिंदुचे खिस्तीकरण करुन त्यांना देखील आपल्या राष्ट्राच्या विरुद्ध बंड करण्यास प्रोत्साहन देतात. नेहरुंच्या आशीर्वादाने झालेले नागांचे सामूहिक धर्मांतर व नागांचे बंड हे याचे ढळढळीत उदाहरण आहे. हिंदू राष्ट्र अशा तऱ्हेच्या 'शिक्षणावर, बंदी घालील. हिंदू राष्ट्र धर्मांनुसार भिन्न शिक्षणाची कल्पनाच आमान्यय करणार नाही. हिंन्दू मुलांनी न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये जावे व मुसलमानांनी अंजुमन हायस्कूलमध्ये जावे हा प्रकार ताबडतोब बंद करण्यात येईल.

तसेच शालेय शिक्षणातून इंग्रजीचे अजीबात उच्चाटण करण्यात येईल. इंग्रजीचा उपयोग ज्यांना जन्मभर अध्ययन/ अध्यापन करायचे आहे त्यांनाच फक्त आहे. असा वर्ग फारच थोडा आहे. इतरांना इंग्रजीचे अक्षरही न अले तर काही बिघडत नाही. गुन्हे पकडणाऱ्या पोलिसाला, प्रशासन करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्याला, न्याय देणाऱ्या न्यायाधीशाला इंग्रजीची आवश्यकता काय ?

विश्वविद्यालयीन शिक्षणात देखील इंग्रजी या एकमात्र परकीय भाषेचा अभ्यास होणे इष्ट नाही. इंग्रजी सारख्याच चीनी, जपानी, रशियन फ्रेंच जर्मन, स्पॅनिश, व इटालियन या भाषा महत्वाच्या आहेत. या भाषापैकी एकीची निवड करणाऱ्याला इंग्रजी आले पाहिजे असा आग्रह धरणे अन्यायाचे आहे. याप्रमाणे इंग्रजीचा एकाधिकार नाहीसा केल्यावर आमचे शिक्षण खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय होईल.

या देशावर कधी काळी इंग्रजी वा मुघली राज्य होते हे

इतिहास वाचल्याशिवाय कळणार नाही इतका या देशाचा कायापालट झाला पाहिजे.

हिंदू राष्ट्राचे एकत्व मजबूत करायचे असेल तर आसेतुहिमाचल वापरली जाणारी एक समान भाषा असणे आवश्यक आहे. संस्कृतप्रधान व नागरी लिपीत लिहिलेली हिंदी हीच फक्त अशी भाषा असू शकते. नेहरुंनी इंग्रजीच्या तर्फे हिंदी व एकूणच देशी भाषांच्या विरुद्ध जिहाद न पुकारता संविधानाची अंमलबजावणी केली असती तर आजपर्यंत हिंदी ही अशी भाषा झाली असती व एका भारतीयाला दुसऱ्या भारतीयांशी बोलण्यास दुभाष्याची गरज भासली नसती.

**संस्कृतचे स्थान**

हिंदीबरोबरच संस्कृतचा वापर आमच्या चिरंतन एकत्वाचे सूत्र म्हणून शिक्षणक्षेत्रात झाला पाहिजे. संस्कृतचा प्रसार कितीही झाला तरी तो इंग्रजीप्रमाणे उच्च शिक्षितातच मर्यादित राहू शकतो; त्यामुळे हिंदीचे स्थान संस्कृतला देता येणार नाही. पण मोर हा जसा आम्ही राष्ट्रीय पक्षी मानला आहे तशी संस्कृत ही राष्ट्रीय भाषा म्हणून घोषित केली पाहिजे. संसदेचे व इतर राज्यविषयक कार्यक्रमांचे प्रारंभ संस्कृत सुभाषित गाऊन करण्याचा पायंडा पाडल्यास संस्कृतचे स्थान राष्ट्रात काय आहे याची जाणीव कायम राहिल. पण केवळ एवढ्या प्रतीकात्मक कृतीने भागणार नाही. शाळातून संस्कृत आवश्यक केले पाहिजे. इंग्रजी ही विद्यापीठीय स्तरावर, एखाद्या परकीय भाषेचा अभ्यास असावा म्हणून शिकण्याची अनेक परकीय भाषापैकी निवडता येण्यासारखी एक भाषा आहे हे तिचे शिक्षणक्रमातील स्थान निश्चित झाल्यावर शाळात तिचे काहीच काम नाही. शाळातून मातृभाषा, हिंदी व संस्कृत या क्रमाने भाषा शिकविण्यात याव्या. प्राथमिक स्तरावर मातृभाषा, दुय्यम स्तरावर हिंदी व उच्च दुय्यम स्तरावर संस्कृत. मातृभाषा हेच सर्वत्र शिक्षणाचे माध्यम असल्यामुळे दुय्यम व त्यापुढील स्तरावर मातृभाषेचे आवश्यक विषय म्हणून शिक्षण देण्याची आवश्यकता नाही.

'संस्कृत मुसलमानांना देखील आवश्यक असावे काय ?' असे मला कोठारी कमिशनच्या सचिवांनी या विषयाच्या चर्चेच्या वेळी विचारले. मी त्यांना उलट विचारले, 'आमचे सरकार जर 'सेक्युलर' आहे तर हिंदू/ मुसलमानात शिक्षणाच्या बाबतीत भेद का ?

पदोपदी धर्मांच्या आधारावर पक्षपात हेच तर मुळी आमच्या 'सेक्युलीरिझमचे' स्वरुप आहे. संस्कृत शिकविताना व्याकरणावर फार भर न देता प्रमुख ग्रंथ अनायासे समजू शकतील हा उद्देश असावा. यासाठी रामायण/महाभारताच्या ५००० श्लोकांची संक्षिप्त आवृत्ती ही दोन पाठ्यपुस्तके असावी.

मुसलमानांना रामायण/महाभारत शिकविणे म्हणजे त्यांच्यावर आपला धर्म लादणे अशी कोल्हेकुई या विरुद्ध सुरु होईल. पण इंडोनिशियादी मुस्लिम देश रामायण/ महाभारत हे आपले राष्ट्रीय ग्रंथ मानतात. बंगलादेशच्या स्थापनेनंतर मुजीबुर रहमान यांनी 'हे सेक्युलर राष्ट्र आहे. असे घोषित करुन बंगलादेश नभोवाणीवर गीतेचे पाठ सुरु केले होते हे काही वाचकांना आठवत असेल. मुसलमानांच्या मुख्य राष्ट्रीय प्रवाहाच्या विलीनीकरणाला मुसलमानांचा विरोध नसून 'सेक्युलॅरिस्टांचा' खरा विरोध आहे. 'बाबराने खरोखरच राममंदिर उद्ध्वस्त करुन त्या ठिकाणी मशीद बांधली असेल तर ती मशीद पाडून तेथे राममंदिर बांधण्यास मी कारसेवा करायला तयार आहे असे शहाबुद्दीन म्हणाले होते, पण नरसिंहारावांनी मात्र देवळे पाडून मशिदी बांधल्या असोत वा नसोत, 'साऱ्याच मशिदी आपण भूषण म्हणून मानल्या पाहिजेत व १९४७ च्या पूर्वीची पूजास्थानांची स्थिती कायम ठेवली पाहिजे. असे विधेयक पारित केले.